MHRG190008612023

:: <u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.१३८/२०२० मधील निशाणी क्र.१७ वरील आदेश</u> ::

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश १, नियम १० अन्वये त्यांना प्रस्तुत भुसंपादन निर्देशन अर्जामध्ये समाविष्ट करुन घेण्याबाबत विनंती केली आहे.

०२. अर्ज व अर्जाला मुळ अर्जदारने दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही पक्षाच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०३. अर्जदाराचे कथन की, हरकतदार क्र.१ दर्शना उर्फ छाया दत्ताराम मुरुडकर, सुजाता विनोद गायकवाड, आणि वैष्णवी विठ्ठल म्हाप्रळकर याच्यातर्फे सामनेवालापणात पक्षकार म्हणुन सामील करण्यासाठी दाखल केला आहे. अर्जदार यास प्रस्तुत भुसंपादन निर्देश अर्जाबाबतची माहिती प्रस्तुत अर्ज सामनेवाला क्र.१ यांच्याकडे दाखल असताना निवाडा झाल्यानंतर मुळ अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज दाखल करणेबाबत हालचाली केल्याचे समजले म्हणुन हरकतदार यांनी चौकशी करुन प्रस्तुत प्रकरणाची सही शिक्क्याची नक्कल प्राप्त केली. अर्जाच्या सुनावणीबाबत माहिती प्राप्त केली असता अर्जदार खरी माहिती कोर्टापासुन लपवुन या प्रकरणामध्ये रक्कम लुबाडण्याचा प्रयत्न करत असल्याचे समजले. प्रस्तुत हरकतदार या अर्जातील विषय मिळकतींचे वारस, सहहिश्शेदार असल्याबाबतचे सर्व पुरावे

हरकतदार यांस संधी मिळाल्यास त्यांचा असणारा वारस, सहहिस्सा शाबीत करण्यास तयार आहेत. सबब, हरकतदार आवश्यक पक्षकार असल्याने त्यांना पक्षकार म्हणुन सामील करुन घेऊन म्हणणे व कैफियत दाखल करण्याची संधी मिळावी याकरिता अर्ज दाखल केल्याचे कथन केले आहे.

०५. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार क्र.१ ते ६ हे इसम विषय मिळकतीचे पुर्वीचे सहमालक मारुती देऊ वाळणकर यांचे वारस असल्याचे भासवुन प्रस्तुत प्रकरणाव्दारे निकाल करुन घेण्याच्या प्रयत्नात आहेत. अशा निकालाचा परिणाम प्रस्तुत हरकतदार यांच्या वारस, सहहक्कावर होणार असल्याने हरकतदार यांना प्रतिवादी पक्षकार म्हणुन सामील करुन घेऊन त्यांना बाजु मांडुन म्हणणे व कैफियत दाखल करण्यास संधी मिळणे आवश्यक आहे. प्रस्तुत हरकतदार यांचा या भुसंपादन निर्देश अर्जामध्ये व त्यातील विषय मिळकतीमध्ये हक्क हितसंबंध असल्याने त्यांना प्रतिवादी पक्षकार म्हणुन सामील करुन घेण्याबाबत विनंती केली आहे.

०६. प्रस्तुत अर्जास विरोध करताना मुळ अर्जदाराचे कथन की, प्रस्तुत अर्ज हा कायदयाने चुकीचा आहे. अर्जदार हे विशेष भुसंपादन अधिकारी यांचेसमोर हजर झाले नसल्यामुळे त्यांना प्रस्तुत प्रकरणात पक्षकार म्हणुन समाविष्ट करता येणार नाही. अर्जदारांनी त्यांचे हक्क सिध्द करण्यासाठी दिवाणी न्यायालयात जाऊन आपले हक्क सिध्द करावेत व त्यानंतर प्रस्तुतच्या भुसंपादन निर्देशन अर्जात पक्षकार म्हणुन समाविष्ट व्हावे. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०७. अर्ज उभयपक्षाच्या परस्पर विरोधी युक्तिवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुतचा मुळ अर्ज संपादित जमीनीच्या मागणीची वाढीव बाजारभावाची रक्कम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. मुळ अर्जदार यांनी सदर अर्जास आक्षेप नोंदविला आहे. सदर प्रकरणाची पडताळणी केली असता असे दिसुन येते की, प्रस्तावीत अर्जदार हे संपादन प्रक्रियेमध्ये समाविष्ठ नव्हते. प्रस्तावित अर्जदारांना सदर मिळकतीमध्ये हक्क आहे किंवा नाही ही बाब या प्रकरणामध्ये विचारात घेता येणार नाही. प्रस्तावित अर्जदारांनी सदर अनुतोष दिवाणी न्यायालयातुन मिळविणे आवश्यक आहे. एकुणच मुळ अर्जदार यांनी उपस्थित केलेली हरकत तथा आक्षेप लक्षात घेता प्रस्तुत अर्जातील अर्जदार यांचे कथन उचित व न्यायसंगत नाही. याकामी मुळ अर्जदार यांच्या विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरण्यात येतो. सदर निष्कर्षास अनुसरुन खालील आदेश पारित.

**:: <u>आदेश</u> ::**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2025.09.20 17:27:39 +0530

महाड
दिनांक २०.०९.२०२५

**(श्रीमती एच.आर. जाधव)**
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड